

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## मराठी विभाग

**गणेशखिंड, पुणे–४११००७**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**डॉ. तुकाराम रोंगटे**

**प्राध्यापक आणि प्रमुख**

==========================================================================

दिनांक : ३० डिसेंबर २०२३

**प्रति,**

**सर्व विभागप्रमुख /संचालक**

विविध शैक्षणिक विभाग

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,

पुणे – ४११ ००७ .

**विषय :** सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त काव्यसंमेलनात विद्यार्थ्यांनी सहभागी होण्याबाबत आवाहन.

महोदय,

मराठी विभागामध्ये दि. ३ जानेवारी २०२४ रोजी, सकाळी ११ वा. रोजी सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त भित्तिपत्रकाचे अनावरण आयोजित करण्यात आलेले आहे. तसेच दरवर्षीप्रमाणे यावर्षीही विद्यार्थ्यांचे काव्यसंमेलन आयोजित करण्यात आलेले आहे. या काव्यसंमेलनासाठी ज्येष्ठ कवयित्री उषाकिरण आत्राम उपस्थित राहणार आहेत.

मराठी विभागाच्या वतीने विविध विभागातील विद्यार्थ्यांना या काव्यसंमेलनात स्वरचित सामाजिक आशयाची कविता सादर करण्यासाठी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे. तरी सर्व विभागप्रमुखांनी आपल्या विभागातील विद्यार्थ्यांना या उपक्रमाबाबत अवगत करावे, ही विनंती. ज्या विद्यार्थ्यांना कविसंमेलनात कविता सादर करावयाची आहे, त्यांनी डॉ. कुंडलिक पारधी **(९५२७ ६९९ ६३१)** यांच्याशी संपर्क साधून नावनोंदणी करावी.

कळावे,

आपला,

डॉ. तुकाराम रोंगटे

प्राध्यापक व प्रमुख
मराठी विभाग
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
पुणे-४११००७.

==========================================================================

**मराठी विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, खेर वाङ्मय भवन, गणेशखिंड, पुणे-०७.**
**संपर्क : कार्यालय - (०२०)२५६०१३४२ चलभाष क्र. - ९९२१२२८७२४**